अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# देशात वेगळ्या राजकीय वाऱ्यांचे संकेत

सध्या एकूणच देशभरामध्ये वेगळे वारे वाहत आहेत, यात काही शंका नाही. आतापर्यंत झालेल्या निवडणुकांपेक्षा २०१४ मध्ये होणारी लोकसभा निवडणूक ही वेगळ्या स्वरुपाची असेल. वेगळा संदेश देणारी किंवा नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या जागृतीची किंवा परिवर्तनाच्या दिशेने आगेकूच करणारी चाहूल या निवडणुकीतून पहायला मिळेल. अशाच पध्दतीचे संकेत सध्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामध्ये दिसत आहेत. गेल्या साठ-पासष्ट वर्षांमध्ये भारतात अनेक प्रकारचे राजकीय प्रयोग झाले. अगदी सलग सहा-सात वेळा एकाच राजकीय पक्षाची एकछत्री सत्ता या देशाने अनुभवली आणि आघाडी सरकारांचे प्रयोगही केले गेले. राजकारणाच्या या सगळ्या प्रवासामध्ये सामान्य नागरिक इतका बाजूला फेकला गेला की, त्याला केंद्रबिंदू मानून देशाचा विकास घडवायचा आहे याचाच सत्ताधाऱ्यांना विसर पडला. स्वकेंद्रीत राजकीय संस्कृती विकसित होत गेली. त्यातून व्यक्तिकेंद्रीत राजकीय पक्षांचे मठ निर्माण झाले आणि नंतरच्या काळात ज्याला 'व्हीआयपी कल्चर' म्हणता येईल. अशाच पध्दतीचे राजकारण विकसित होत गेले. मग निवडून येणारा सरपंच असो, नगरसेवक असो, आमदार असो, खासदार असो. अशी सगळी ही राजकीय भुतावळ म्हणजे सामान्य जनतेच्या मानगुटीवर बसलेले व्हीआयपी कल्चरचे वेताळच ठरत गेली. आपले महत्त्व अबाधित ठेवण्याकरिता सगळीच राजकीय व्यवस्था वेठीला धरली गेली. लोकशाही मूल्यांचे अपहरण झाले आणि या व्हीआयपी कल्चरमधून अलिखीत आणि हुकूमशाहीचा उग्र वास असलेल्या राजकीय दादागिरीने आपले पाय पसरले. या सगळ्या प्रकाराला छेद देणारा आवाज दोन वर्षांपूर्वी अण्णा हजारेंच्या उपोषणाच्या निमित्ताने देशभर घुमला. लोकपाल विधेयकाची मागणी झाली. पण त्या विधेयकाच्या अनुषंगाने आतापर्यंत क्षीण झालेला लोकांचा आवाज एक नवी शक्ती घेऊन अवतरला. दिल्लीमध्ये आम आदमी पार्टीच्या निमित्ताने या क्षीण आवाजाचे स्वरुप व्यक्त झाले. चाळीस-चाळीस वर्षे राजकारणामध्ये ठाण मांडून बसलेल्या अनेक दिग्गजांना आम आदमी पार्टीच्या अत्यंत नवख्या उमेदवारांनी घरचा रस्ता दाखवला. त्यातूनच एका राजकीय परिवर्तनाच्या दिशेने लोकमोहीम मार्गक्रमण करू शकते, असा विश्वासही देशभरातल्या जनसामान्यांना वाटला. कोणतीच मोठी राजकीय पार्श्वभूमी नसताना किंवा कोणत्याच मोठ्या चळवळीचा अनुभव नसताना, आंदोलनांच्या माध्यमातून कार्यकर्ता म्हणूनही फारशी माहिती नसताना अरविंद केजरीवालसारखा तरुण देशाची राजधानी असलेल्या दिल्लीचा मुख्यमंत्री म्हणून सूत्रे घेऊ शकला. या सगळ्या बदलाला एक प्रयोग जरी म्हटले तरी हरकत नाही. मात्र लोकशक्तीतून परिवर्तनाचे वारे सशक्त होत आहेत हे लोकशाहीच्या भवितव्यासाठी फार मोठे सुचिन्ह ठरते.

### व्हीआयपी कल्चरला तडाखे

लोकजागृतीचा एक अनोखा प्रयोग सुरू झालेला आहे. आतापर्यंत पठडीबंद असलेल्या राजकारणाच्या चौकटीला तडाखे बसू लागले आहेत. ही जागृती गेल्या दीड-दोन वर्षातली असल्यामुळे त्यात काही दोषही असू शकतात. परंतु, याचा अर्थ जनजागृतीची ही चळवळच अनावश्यक, अनाठायी किंवा अराजकता निर्माण करणारी आहे असे म्हणता येणार नाही. दिल्लीतल्या मुख्यमंत्र्याने रस्त्यावर येऊन आंदोलन करणे हे कदाचित चुकीचे असू शकेल. परंतु एक व्यक्ती म्हणून आणि आतापर्यंतच्या झापडबंद राजकीय हडेलहप्पीला त्यानिमित्ताने आव्हान दिले गेले. रस्त्यावर बसून मुख्यमंत्री आंदोलन करतो याबद्दल मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली. त्याच्या योग्य अयोग्यतेचा विचार यथावकाश होऊ शकेल. परंतु त्याला एकदम अराजकता ठरवणे, तितकेच स्वार्थीपणाचे म्हणावे लागेल. आतापर्यंतच्या इतिहासात देशाच्या राष्ट्रपतींनी अशा प्रकारचा एखादा राजकीय संदर्भ घेऊन मत व्यक्त करण्याचा प्रकार पहिल्यांदा घडला. आम आदमी पार्टीच्या आंदोलनाचा उल्लेख न करता राष्ट्रपतींनी आपल्या प्रजासत्ताक दिनाच्या संदेशामध्ये या आंदोलनाला अराजक ठरवले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रपतींना आपल्या भाषणात त्याची दखल घ्यावी लागली. यावरून या आंदोलनाचे वेगळेपण सिध्द होते. आम्ही पुन्हा सांगतो की, हे आंदोलन योग्य की अयोग्य यापेक्षाही ते वेगळेपणाचे वारे दर्शवणारे होते हे तरी मान्य करावेच लागेल. मुख्यमंत्र्याने शपथ घेऊन घटनात्मक जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे उपदेश दिले गेले. परंतु गेल्या साठ-पासष्ट वर्षांमध्ये लोकांच्या मुलभूत घटनात्मक हक्कांची अक्षरश: पायमल्ली झाली याचा विचार करायला कोणीही तयार नाही. दिल्लीत जर स्वतंत्र राज्य निर्माण केले गेले असेल तर तिथली पोलीस यंत्रणा त्या राज्याच्या अंतर्गत असली पाहिजे, यात चुकीचे काय आहे. हे राज्य निर्माण होऊन आज वीस-पंचवीस वर्षे होतील आणि एकाही राजकीय पक्षाला दिल्लीची पोलीस यंत्रणा स्वतंत्र असावी याची गरजच वाटू नये. यावरून त्यांच्या हडेलहप्पीपणाचे दर्शन घडते. मग निर्भयासारख्या अनेक महिलांवर होणारे अत्याचार दिल्लीत वाढत जाणारी गुन्हेगारी याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. कारण त्याला याच राजकारण्यांनी खतपाणी घातले, असे म्हणण्याशिवाय पर्याय उरत नाही.

### सामान्यांच्या घटनात्मक हक्कांचे काय

या सगळ्या मूलभूत प्रश्नांची उकल करणारी चळवळ देशामध्ये निर्माण झाली पाहिजे. ही आम आदमी पार्टीच्या माध्यमातूनच होईल, असेही समजण्याचे कारण नाही. कारण शेवटी एक विशिष्ट उद्देश घेऊन आम आदमी पार्टी निर्माण झाली. त्यात अतिउत्साही लोकांचा भरणा असू शकतो. परंतु देशातल्या समंजस वर्गाने राजकारणातला हा परंपरेने चालत असलेला असमंजसपणा दूर करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. लोकशाही आणि घटनात्मक चौकट याचा आतापर्यंत या राजकीय पक्षांनी स्वत:च्या स्वार्थासाठी उपयोग केला. घटनेची निर्मितीच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर झाली आहे. यातल्या एकाही सूत्राचे भक्कम उदाहरण प्रस्थापित राजकीय पक्ष करू शकलेला नाही. ही ती लोकशाहीची शोकांतिका आहे. एकाच पठडीमध्ये राहून लोकांची दिशाभूल केली गेली. स्वत:चे स्थान अबाधित ठेवण्याकरता व्हीआयपी कल्चर आणि लाल दिव्याच्या गाडीची मिजास वाढली. या सगळ्या साचेबंद आणि स्वार्थांध राजकीय ढोंगबाजीला तडाखे बसायला सुरुवात झालेली आहे. म्हणूनच यंदाच्या लोकसभा निवडणुकीतून वेगळ्या राजकीय वाऱ्यांचे स्पष्ट संकेत मिळत आहे.